# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी

इतिवृत्त

दिनांक : २०/०२/२०२६

दि. २०/०२/२०२६ रोजी घेण्यात आलेल्या महानगरपालिकेच्या विशेष सभा क्र.१ च्या सभेचे इतिवृत्त.

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेची विशेष सभा क्र.१ शुक्रवार, दि. २०/०२/२०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता महापालिका मुख्यालयाच्या ३ -या मजल्यावरील स्व.विलासरावजी देशमुख सभागृहात घेण्यात आली. सदर सभेत मा.डॉ.श्रीकृष्णनाथ पांचाळ, जिल्हाधिकारी, ठाणे हे पिठासिन अधिकारी या स्थानी आसनस्थ होते. खालील दर्शविलेले सन्मा.सदस्य / सदस्या उपस्थित होते/होत्या.

१. श्रीम.नेहा नविन काठवले
२. श्रीम.प्रतिभा विलास पाटील
३. अॅड.मयुरेश विलास पाटील
४. श्री. विलास रघुनाथ पाटील
५. अॅड.नगमा फिरदुस हिकमतुल्लाह अन्सारी
६ . श्रीम.खान ईशा इमरान
७. श्री.फारूकी हसनैन इम्तियाज
८. श्री. खान अब्दुल रेहमान निजामुद्दीन
९. श्रीम.रुतिका सतिश पाटील
१०.श्रीम.सिद्दीकी शाहीना सजु
११.श्रीम.अन्सारी सैफुल्ला
१२.श्री.वाघमारे रोहिदास रंगनाथ
१३.श्रीम.फरजाना इरफान सय्यद
१४.श्रीम.अन्सारी मुसर्रत मोहम्मद अरशद
१५.श्री.अन्सारी अलताफ राजा
१६.श्री.शेख महबुब अब्दुल रशीद
१७.डॉ.मोहम्मद तालीश मोहम्मद असिफ मोमीन
१८.श्रीम.निलमा मलिक अहमद मोमीन
१९.श्रीम.अन्सारी अनम तारिक
२०.श्री.बहाऊद्दीन फराज फजल
२१.श्री.वैभव एकनाथ भोईर
२२.श्रीम.रिषिका प्रदीप राका
२३.श्रीम.रोमा निलेश आळशी
२४.श्री.जावेद गुलाम मोहम्मद दळवी
२५.श्री.मोहम्मद ताहा रियाज अहमद मोमीन
२६.श्रीम.मोमीन अरशी अनवर
२७.श्रीम.अन्सारी रेश्मा बानो वसीम अहमद
२८.श्री.खान फैसल अख्तर हुसैन
२९.श्री.मोहमद आजीब जमाल अहमद मोमीन
३०.श्रीम.कशफी शाफ मोमीन
३१.श्रीम.अंसारी शबाना शमीम
३२.श्री.शेख अरीब मोहम्मद याकूब
३३.श्री.मोमीन तारिक अब्दुल बारी
३४.श्रीम.अंसारी निखत दानिश
३५.श्रीम.अंसारी जोहा असरार
३६.श्री.लाड प्रशांत अशोक
३७.श्री.अन्सारी जुबेर अहमद मो. फारूक
३८.श्रीम.सना बानो रियाज अहमद अन्सारी
३९.श्रीम.अन्सारी शबाना
४०.श्री.खान खान आतिफ नौशाद
४१.श्री.विजय भगवान भगत
४२.श्रीम.शेख सबीहा इसाक
४३. श्रीम.अन्सारी जाहेदा बानो
४४.श्री.अन्सारी हुजैफा
४५. श्रीम.नादीया इरशाद खान
४६.श्रीम.सिध्दीकी शाहीददुणिसा इसरार उद्दीन
४७.श्रीम.खान रजिया नासीर
४८.श्री.अन्सारी साजिद हुसैन
४९. श्रीम.दांडेकर मनिषा सुनिल
५०.श्रीम.म्हात्रे सुचिता रुपेश
५१. श्रीम.नाईक अस्मिता प्रभुदास
५२.श्री.चौधरी बाळाराम मधुकर
५३.श्रीम.मुजावर समरीन बानो इस्माईल
५४.श्रीम.मोमीन शबिना बानु मह. युसुफ
५५. श्रीम.तबस्सुम जाकिर बेग
५६.श्री.खान अब्दुल रहमान खुरा रजा
५७. श्रीम.तांबोळी रुकसाना अरिफ
५८.श्रीम.खान सबीया दीन मो.
५९. श्री.चौधरी रोहित बाळाराम
६०.श्री.चौघुले परेश चंद्रकांत
६१. श्रीम.ठाकूर क्षमा मनोज
६२.श्रीम.पाटील स्नेहा मेहुल
६३. श्री.शेट्टी राजेश मंजय्या
६४.श्रीम.गायकवाड नंदिनी महेंद्र

६५. श्री.पाटील सुमित पुरुषोत्तम
६६. श्रीम.रंजिता मोहन कोंडा
६७. श्री.शेट्टी संतोष मंजय्या
६८. श्रीम.फुटाणकर अश्विनी सन्नी
६९. श्रीम.मढवी दिपा दिपक
७०.श्री.अबुसाद अशफाक अहमद शेख
७१. श्री.नकाते सुहास जालिंदर
७२. श्रीम.अन्सारी समीना मोहम्मद इमरान
७३. श्रीम.शेख सलमाबानो मो. अकरम
७४. श्री.अन्सारी शकील मुस्तकीम
७५. श्री.खान अमन ओबैद
७६. श्रीम.जगताप प्रिती विवेक
७७. श्री.टावरे प्रकाश राजाराम
७८. श्रीम.म्हात्रे सुवर्णा मोहन
७९. श्री.टावरे यशवंत जयराम
८०. श्री.भोईर संजय गणपत
८१. श्रीम.काटेकर वंदना मनोज
८२. श्रीम.भगत वनिता सुनिल
८३. श्री.काटेकर मनोज मोतीराम
८४. श्रीम.गीता विठोबा नाईक
८५. श्री.पाटील कमलाकर परशुराम
८६. श्रीम.दिव्या समीर पाटील
८७. श्रीम.चौधरी भारती हनुमान
८८. श्री.नारायण रतन चौधरी
८९. श्री. निलेश हरिश्चंद्र चौधरी

तर श्री.नितेश नामदेव ऐनकर हे सन्मा.सदस्य अनुपस्थित होते.

**नगरसचिव :-** कृपया सर्वांनी राष्ट्रगीतासाठी उभे रहावे.
(वंदे मातरम् हे राष्ट्रगीत व राज्यगीत सुरुवात करण्यांत आली.)

**नगरसचिव :-** आजच्या या विशेष महासभेमध्ये सन्मा.डॉ.श्रीकृष्णनाथ पांचाळ, जिल्हाधिकारी, ठाणे हे पिठासिन अधिकारी म्हणून सभेचे संचलन करतील व त्यांच्या नियंत्रणाखाली आजच्या विशेष सभेचे कामकाज चालेल.

मी आजच्या विषय पत्रिकेवरील विषय क्र.१ वाचून दाखवितो.

**विषय क्र.१: महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम १९(१) मध्ये तरतूद प्रमाणे पालिका सदस्यांपैकी एका सदस्याची भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या "महापौर"पदासाठी अडीच वर्षासाठी निवड करणे.**

महाराष्ट्र शासनाकडील दि.२२ जानेवारी २०२६ च्या राजपत्रानुसार सार्वत्रिक निवडणूक २०२६ नंतरच्या पहिल्या सत्रासाठी भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेसाठीचे महापौर हे पद अनारक्षित आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका (महापौर आणि उपमहापौर या पदांसाठी निवडणूका घेणे) नियम २००५ चे कलम ४ नुसार दिनांक १६/०२/२०२६ रोजी नामनिर्देशन पत्रे प्राप्त झालेली आहेत. महापौर पदासाठी ०९ उमेदवारांचे एकूण १० नामनिर्देशन पत्रे प्राप्त झालेली आहेत. उमेदवारांचे व त्यांचे सूचक, अनुमोदकांचे नांवे मी वाचून दाखवितो. ती येणेप्रमाणे आहेत :-

| अ.क्र. | वेळ | उमेदवाराचे नांव व प्रभाग क्रमांक | सुचकाचे नाव व प्रभाग क्रमांक | अनुमोदकाचे नांव व प्रभाग क्रमांक |
|---|---|---|---|---|
| १ | ३.१५ | विलास रघुनाथ पाटील १-ड | नेहा नविन काठवले १-अ | नितेश नामदेव ऐनकर २२-क |
| २ | ३.२० | ॲड.मयुरेश विलास पाटील १-क | कशफी शाफ मोमीन ८-ब | मोहमद आजीब जमाल अहमद मोमीन ८-अ |
| ३ | ३.३० | चौधरी बाळाराम मधुकर १३-ड | चौधरी रोहित बाळाराम १५-क | तांबोळी रुकसाना अरिफ १५-अ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४ | ३.३४ | म्हात्रे सुचिता रुपेश<br>१३-ब | भोईर संजय गणपत<br>२१-अ | काटेकर वंदना मनोज<br>२१-ब |
| ५ | ३.३९ | मोमीन तारिक अब्दुल बारी<br>९-अ | मोहम्मद ताहा रियाज अहमद<br>मोमीन ७-अ | शेख महबुब अब्दुल रशीद<br>४-ड |
| ६ | ३.५० | नारायण रतन चौधरी<br>२३-क | चौघुले परेश चंद्रकांत<br>१६-अ | शेट्टी राजेश मंजय्या<br>१६-ड |
| ७ | ३.५१ | नारायण रतन चौधरी<br>२३-क | फुटाणकर अश्विनी सन्नी<br>१८-अ | मढवी दिपा दिपक<br>१८-ब |
| ८ | ३.५३ | पाटील स्नेहा मेहुल<br>१६-क | जगताप प्रिती विवेक<br>२०-अ | अबुसाद अशफाक अहमद शेख<br>१८-क |
| ९ | ४.०८ | जावेद गुलाम मोहम्मद दळवी<br>६-ड | रिषिका प्रदीप राका<br>६-ब | रोमा निलेश आळशी<br>६-क |
| १० | ४.२८ | प्रतिभा विलास पाटील<br>१-ब | अंसारी शबाना शमीम<br>८-क | शेख सलमाबानो मो.अकरम<br>१९-ब |

नियम ६ नुसार सर्व नामनिर्देशन पत्रे मा.पिठासिन अधिकारी यांचेकडे सादर करीत आहे.
(मा.पिठासिन अधिकारी यांनी सर्व नामनिर्देशन पत्रांची छाननी केली.)

**पिठासिन अधिकारी:-** सर्व नवनिर्वाचित नगरसेवकांचे प्रथम अभिनंदन करतो. पिठासिन अधिकारी म्हणून आज येथे माझी नेमणूक झालेली आहे. भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या महापौर पदासाठी एकूण ०९ उमेदवारांनी आपले १० नामनिर्देशन अर्ज दाखल केलेले आहेत व नामनिर्देशन पत्राचा मी सर्व दृष्टीने छाननी केलेली आहे. त्याप्रमाणे ०९ उमेदवारांची नामनिर्देशन पत्रे वैध आहेत त्यांची नांवे मी वाचून दाखवितो.

१) विलास रघुनाथ पाटील
२)ॲड.मयुरेश विलास पाटील
३)चौधरी बाळाराम मधुकर
४)म्हात्रे सुचिता रुपेश
५) मोमीन तारिक अब्दुल बारी
६) नारायण रतन चौधरी
७) पाटील स्नेहा मेहुल
८) जावेद गुलाम मोहम्मद दळवी
९) प्रतिभा विलास पाटील

नारायण रतन चौधरी यांनी महापौर पदासाठी २ नामनिर्देशन पत्र दाखल केले असून उर्वरीत ८ उमेदवारांनी प्रत्येकी एक नामनिर्देशन पत्र दाखल केले आहेत व ती सर्वच्या सर्व नामनिर्देशन पत्रे वैध आहेत.

प्रथम महापौर पदासाठी निवडणूक होणार आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका (महापौर आणि उपमहापौर या पदांसाठी निवडणूका घेणे) नियम २००५ मधील नियम ६(३) च्या तरतूदीनुसार ज्या यथोचितरित्या नामनिर्देशित उमेदवारांपैकी जर कोणाला आपली उमेदवारी मागे घ्यावयाची असेल तर त्यांना १५ मिनिटांचा अवधी देण्यात येत आहे. सभागृहातील घड्याळामध्ये आता दुपारचे १२.१७ वाजलेले आहेत तरी उमेदवारी मागे घेण्याची वेळ सुरु झाली आहे.

**श्री.काटेकर मनोज**:- मा.पिठासिन अधिकारी सो, महापौर पदाचे उमेदवार श्री.विलास पाटील, नगरसेवक हे काही कोर्ट मॅटरमुळे पोलिसांच्या ताब्यात होते ते निवडणूकीसाठी येत असून ट्रॅफिकमध्ये आहेत तरी आमची मागणी आहे की उमेदवारी मागे घेण्याचा कालावधी वाढविण्यात यावा. तसेच श्री.विलास पाटील यांचेकडे मा.न्यायालयाची ऑर्डर आहे, अशी आमची विनंती आहे.

**ॲड.मयुरेश पाटील**:- मा.पिठासिन अधिकारी सो, माझी विनंती आहे की महापौर पदाचे उमेदवार आल्यानंतर उमेदवारी मागे घेण्यासाठी १५ मिनिटांचा अवधी देण्यात यावा व तशी मा.कोर्टाची ऑर्डर आहे.

**पिठासिन अधिकारी**:- महापालिका अधिनियमातील तरतूदीनुसार व सभागृहाच्या नियमानुसार महापौर निवडीच्या सभेचे कामकाज चालू आहे.

**श्रीम.पाटील प्रतिभा**:- सभागृहाचे नियम आहेत परंतु पोलिसांचे आदेश व कोर्टाचे आदेशांचे पालन व्हावे, अशी विनंती आहे.

**ॲड.मयुरेश पाटील**:- कोर्टाचे आदेश आहेत की दि.२०/०२/२०२६ रोजी होणा-या महापौर निवडीच्या सभेकरिता सकाळी ११.०० ते दुपारी ३.०० या कालावधीकरिता श्री.विलास पाटील यांना उपस्थित राहणेची परवानगी दिलेली आहे. म्हणून माझी विनंती आहे की उमेदवार रस्त्यामध्ये ट्रॅफिक असल्याने विलंब होत आहे. तरी कोर्टाच्या आदेशाचे पालन व्हावे व त्यानुसार उमेदवार आल्यानंतर उमेवारी मागे घेण्यासाठी १५ मिनिटांचा कालावधी देण्यास सुरुवात करावी.

**श्री.मोमीन तारीक**:- कोर्टाकडूनअशी कोणतीही ऑर्डर अथवा सूचना आलेली नाही तरी नियमानुसार सभागृहाचे कामकाज व्हावे.

**श्री.लाड प्रशांत**:- जर मा.पिठासिन अधिकारी यांचेकडे कोर्टाची ऑर्डर आली असेल तर त्याचे पालन व्हावे. तसेच आजच्या सभेचा अजेंडा पूर्वीच काढून दिनांक व वेळ दिलेली आहे तरी त्यानुसार महापौर निवड होईल व आधीच नामनिर्देशन पत्र मागे घेण्यासाठी १५ मिनिटांची वेळ दिलेली आहे.

**पिठासिन अधिकारी**:- नगरसेवकांचे म्हणणे आहे की कोर्टाचे आदेश आहेत तरी पिठासिन अधिकारी म्हणून कोर्टाचे आदेश माझ्या निदर्शनास आणून द्यावे.

**श्रीम.पाटील प्रतिभा**:- श्री.पाटील साहेब हे टाटा आमंत्रापर्यंत आले आहेत तरी अजून १५ मिनिटांची वेळ वाढवून द्यावी, ही विनंती आहे.

(ॲड.मयुरेश पाटील यांनी मोबाईल फोनवरील मेसेज मा.पिठासिन अधिकारी यांना दाखविला.)

**श्री.मोमीन तारीक**:- अशी कोणत्याही प्रकारची ऑर्डर महापालिकेला प्राप्त झाली आहे किंवा कसे व मोबाईलवरील ऑर्डर मान्य करणार कां? तरी नामनिर्देशन पत्र मागे घेण्याच्या कार्यवाहीस सुरुवात करावी.

**पिठासिन अधिकारी**:- आता सदस्यांना सांगितले त्याप्रमाणे कोर्टाचे आदेश प्राप्त झाल्याचे महापालिका सचिव किंवा आयुक्तांनी मला सांगितलेले नाही. नामनिर्देशन पत्र मागे घेण्यासाठी कालावधी दिलेला आहे तरी या कालावधीत जर कोणा उमेदवारांना त्यांचे नामनिर्देशन पत्र मागे घेऊ शकतात, त्यानंतर पुढील प्रक्रिया होईल.

**ॲड.मयुरेश पाटील**:- नामनिर्देशन पत्र मागे घेण्यासाठी वेळ किती वाजता सुरु होणार आहे?

**पिठासिन अधिकारी**:- यापूर्वी दुपारी १२.१७ वाजल्यापासून उमेदवारी मागे घेण्याची वेळ दिली आहे व सदर वेळेस सुरुवात झाली आहे.

**ॲड.मयुरेश पाटील**:- ऑर्डरमध्ये स्पष्ट दिले आहे त्यानुसार जोपर्यंत उमेदवा सचिवांच्या ताब्यात येत नाही तोपर्यंत निवडणूक प्रक्रिया सुरु करता येणार नाही.

**पिठासिन अधिकारी**:- अधिनियम २००५ मधील कलम ३(३) नुसार महापालिकेची पहिली बैठक कोणत्याही कारणास्तव रद्द अथवा तहकूब करता येत नाही. बैठक सुरु होण्यापूर्वी नगरसेवकांनी वेळ मागून घेतला असता तर बाब वेगळी असती. बैठक सुरु केल्यानंतर १५ मिनिटांसाठी तहकूब करण्याची अधिनियमात तरतूद नाही. बैठक सुरु झाल्यानंतर शेवटपर्यंत नियमानुसार चालविणे आवश्यक आहे.

**ॲड.मयुरेश पाटील**:- आपले म्हणणे मान्य आहे परंतु कोर्टाचे स्पष्ट आदेश आहेत की जे उमेदवार आहेत ते नगरसचिवांकडे आल्यानंतर महापौर व उपमहापौर निवड प्रक्रिया सुरु करावी. तरी आपल्याला विनंती आहे की जोपर्यंत उमेदवार महापालिका सचिव यांचेकडे सुपूर्त होत नाही तोपर्यंत ही प्रक्रिया सुरु करु नये.

**श्री.लाड प्रशांत**:- मा.पिठासिन अधिकारी सो, उमेदवारी मागे घेण्यासाठी आपण दिलेली वेळ ग्राह्य धरायची की कसे?

**पिठासिन अधिकारी**:- यापूर्वी दुपारी १२.१७ मिनिटांनी नामनिर्देशन पत्र मागे घेण्यासाठी १५ मिनिटांचा कालावधी सुरु झालेला आहे तोच ग्राह्य धरण्यात येत आहे.

(सभागृहाच्या घड्याळात दुपारचे १२.३० वाजले होते.)

**पिठासिन अधिकारी**:- नामनिर्देशन पत्र मागे घेण्यासाठी २ मिनिटांचा अवधी शिल्लक आहे तरी कोणाला नामनिर्देशन पत्र मागे घ्यायचे असेल तर तसा अर्ज देण्यात येत आहे.

(सभागृहाच्या घड्याळात दुपारचे १२.३२ वाजले होते.)

**पिठासिन अधिकारी**:- आता दुपारचे १२.३२ वाजले आहेत तरी नामनिर्देशन पत्र मागे घेण्याचा कालावधी संपलेली आहे. महापौर पदासाठी एकूण ९ नामनिर्देशन पत्र दाखल झाली होती व उमेदवारी मागे घेण्याच्या कालावधीमध्ये ६ उमेदवारांनी आपली उमेदवारी मागे घेतलेली आहे. उमेदवारी मागे घेतली त्यांची नांवे वाचून दाखवितो.

१)ॲड.मयुरेश विलास पाटील
२)चौधरी बाळाराम मधुकर
३)म्हात्रे सुचिता रुपेश
४) मोमीन तारिक अब्दुल बारी
५) जावेद गुलाम मोहम्मद दळवी
६) प्रतिभा विलास पाटील

तर नारायण रतन चौधरी यांचे दोन नामनिर्देशन पत्र प्राप्त असून ते दोन्ही वैध आहेत तरी एक नामनिर्देशन पत्र कायम करण्यात येत आहे. सद्यस्थितीत १) विलास रघुनाथ पाटील २) नारायण रतन चौधरी व ३) पाटील स्नेहा मेहुल हे तीन उमेदवार महापौर पदासाठी वैध आहेत.

**ॲड.मयुरेश पाटील**:- श्री.पाटील साहेब, महापालिका इमारतीमध्ये तळमजल्यावर आले आहेत व याठिकाणी उपस्थित होण्यासाठी २ मिनिटांचा अवधी लागणार आहे तरी निवडणूक प्रक्रियेस ते आल्यानंतर सुरुवात करावी, ही विनंती आहे.

**पिठासिन अधिकारी**:- आपण सांगितल्याप्रमाणे सभा तहकूब करता येणार नाही व मतदान चालू असताना ते आले तर मतदान करु शकतील. तरी आता महापौर पदासाठी निवडणूक प्रक्रिया सुरु होत आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका (महापौर आणि उपमहापौर या पदांसाठी निवडणूका घेणे) नियम २००५ मधील अधिनियम ७(३) महापौर पदाच्या निवडणूकीमध्ये हात वर करुन मतदान करण्याची तरतूद आहे. याबाबत काही महत्वाच्या सूचना मी आपल्याला देत आहे त्यांचे काटेकोरपणे पालन व्हावे. या संपूर्ण प्रक्रियेचे व्हिडिओ शूटींग केले जात आहे. ज्या उमेदवाराला आपण हात वर करुन मतदान केले आहे त्यांनी आपल्या नावासमोर मतदान केल्याबाबत स्वाक्षरी करावयाची आहे. आपल्या सह्या झाल्यानंतर मतदानअंती कोण निवडून आले आहे, हे मी जाहिर करणार आहे. ज्या पालिका सदस्यांचे मत एकदा नोंदविण्यात आले आहे, अशा

सदस्यांस पुन्हा मत देण्याची वा आपले मत बदलण्याची मुभा नियमात नाही. मतदान प्रक्रिया आता सुरु होत आहे. अंतिमत: निवडणूक लढविणारे उमेदवार आहेत त्यांच्या आडनावानुसार वर्णानुक्रमे (मराठी वर्णमाला) मतदान होईल.
वर्णानुक्रम –

१) नारायण रतन चौधरी
२) विलास रघुनाथ पाटील
३) पाटील स्नेहा मेहुल

श्री.नारायण रतन चौधरी यांचे नांव वर्णानुक्रमाने आधी येत आहे. त्यामुळे आधी त्यांच्यासाठी मतदान होईल. उपस्थित ज्या सदस्यांना श्री.नारायण रतन चौधरी यांना महापौर पदासाठी मतदान करायचे आहे त्यांनी कृपया आपला हात वर करायचा आहे व मतदान केल्याबद्दल स्वाक्षरी करायची आहे.

(श्री.विलास रघुनाथ पाटील, सदस्य हे महासभागृहामध्ये उपस्थित झाले.)

महापौर पदाचे उमेदवार श्री.नारायण रतन चौधरी यांच्या बाजूने खालील सदस्यांनी मतदान केले.

| अ.क्र. | सदस्यांचे नांव | अ.क्र. | सदस्यांचे नांव |
|---|---|---|---|
| १ | ॲड. नगमा फिरदुस हिकमतुल्लाह अन्सारी | २ | खान ईशा इमरान |
| ३ | फारूकी हसनैन इम्तियाज | ४ | खान अब्दुल रेहमान निजामुद्दीन |
| ५ | रुतिका सतिश पाटील | ६ | सिद्दीकी शाहीना सजु |
| ७ | अन्सारी सैफुल्ला | ८ | वाघमारे रोहिदास रंगनाथ |
| ९ | फरजाना इरफान सय्यद | १० | अन्सारी मुसर्रत मोहम्मद अरशद |
| ११ | अन्सारी अलताफ राजा | १२ | शेख महबुब अब्दुल रशीद |
| १३ | डॉ. मोहम्मद तालीश मोहम्मद असिफ मोमीन | १४ | निलमा मलिक अहमद मोमीन |
| १५ | अन्सारी अनम तारिक | १६ | बहाऊद्दीन फराज फजल |
| १७ | मोहम्मद ताहा रियाज अहमद मोमीन | १८ | मोमीन अरशी अनवर |
| १९ | अन्सारी रेश्मा बानो वसीम अहमद | २० | खान फैसल अख्तर हुसैन |
| २१ | मोमीन तारिक अब्दुल बारी | २२ | अंसारी निखत दानिश |
| २३ | अंसारी जोहा असरार | २४ | लाड प्रशांत अशोक |
| २५ | अन्सारी जुबेर अहमद मो. फारूक | २६ | सना बानो रियाज अहमद अन्सारी |
| २७ | अन्सारी शबाना | २८ | खान खान आतिफ नौशाद |
| २९ | विजय भगवान भगत | ३० | शेख सबीहा इसाक |
| ३१ | अन्सारी जाहेदा बानो | ३२ | अन्सारी हुजैफा |
| ३३ | नादीया इरशाद खान | ३४ | सिध्दीकी शाहीददुणिसा इसरार उद्दीन |
| ३५ | खान रजिया नासीर | ३६ | अन्सारी साजिद हुसैन |
| ३७ | मुजावर समरीन बानो इस्माईल | ३८ | मोमीन शबिना बानु मह. युसुफ |
| ३९ | तबस्सुम जाकिर बेग | ४० | खान अब्दुल रहमान खुरा रजा |
| ४१ | गायकवाड नंदिनी महेंद्र | ४२ | फुटाणकर अश्विनी सन्नी |
| ४३ | मढवी दिपा दिपक | ४४ | अबुसाद अशफाक अहमद शेख |

| | | | |
|---|---|---|---|
| ४५ | नकाते सुहास जालिंदर | ४६ | अन्सारी समीना मोहम्मद इमरान |
| ४७ | अन्सारी शकील मुस्तकीम | ४८ | नारायण रतन चौधरी |

**पिठासिन अधिकारी:-** आता महापौर पदाचे दुसरे उमेदवार श्री.विलास रघुनाथ पाटील यांच्यासाठी मतदान घेतले जाणार आहे तरी ज्या सदस्यांना आपले मत श्री.विलास रघुनाथ पाटील यांस द्यावयाचे असल्यास त्यांनी आपला एक हात वर करावा आणि मतदान केल्याबद्दल आपल्या नावासमोर स्वाक्षरी करावी.

महापौर पदासाठी दुसरे उमेदवार श्री.विलास रघुनाथ पाटील यांच्या बाजूने खालील सदस्यांनी मतदान केले.

| अ.क्र. | सदस्यांचे नांव | अ.क्र. | सदस्यांचे नांव |
|---|---|---|---|
| १ | नेहा नविन काठवले | २ | प्रतिभा विलास पाटील |
| ३ | अ‍ॅड. मयुरेश विलास पाटील | ४ | विलास रघुनाथ पाटील |
| ५ | रिषिका प्रदीप राका | ६ | रोमा निलेश आळशी |
| ७ | जावेद गुलाम मोहम्मद दळवी | ८ | मोहमद आजीब जमाल अहमद मोमीन |
| ९ | कशफी शाफ मोमीन | १० | अंसारी शबाना शमीम |
| ११ | शेख अरीब मोहम्मद याकूब | १२ | दांडेकर मनिषा सुनिल |
| १३ | म्हात्रे सुचिता रुपेश | १४ | नाईक अस्मिता प्रभुदास |
| १५ | चौधरी बाळाराम मधुकर | १६ | तांबोळी रुकसाना अरिफ |
| १७ | खान सबीया दीन मो. | १८ | चौधरी रोहित बाळाराम |
| १९ | शेख सलमाबानो मो. अकरम | २० | खान अमन ओबैद |
| २१ | भोईर संजय गणपत | २२ | काटेकर वंदना मनोज |
| २३ | भगत वनिता सुनिल | २४ | काटेकर मनोज मोतीराम |
| २५ | पाटील कमलाकर परशुराम | | ------------------------ |

**पिठासिन अधिकारी:-** आता महापौर पदाचे तिसरे उमेदवार श्रीम.पाटील स्नेहा मेहुल यांच्यासाठी मतदान घेतले जाणार आहे तरी ज्या सदस्यांना आपले मत श्रीम.पाटील स्नेहा मेहुल यांस द्यावयाचे असल्यास त्यांनी आपला एक हात वर करावा आणि मतदान केल्याबद्दल आपल्या नावासमोर स्वाक्षरी करावी.

महापौर पदासाठी तिसरे उमेदवार श्रीम.पाटील स्नेहा मेहुल यांच्या बाजूने खालील सदस्यांनी मतदान केले.

| अ.क्र. | सदस्यांचे नांव | अ.क्र. | सदस्यांचे नांव |
|---|---|---|---|
| १ | वैभव एकनाथ भोईर | २ | चौघुले परेश चंद्रकांत |
| ३ | ठाकूर क्षमा मनोज | ४ | पाटील स्नेहा मेहुल |
| ५ | शेट्टी राजेश मंजय्या | ६ | पाटील सुमित पुरुषोत्तम |
| ७ | रंजिता मोहन कोंडा | ८ | शेट्टी संतोष मंजय्या |
| ९ | जगताप प्रिती विवेक | १० | टावरे प्रकाश राजाराम |
| ११ | म्हात्रे सुवर्णा मोहन | १२ | टावरे यशवंत जयराम |
| १३ | गीता विठोबा नाईक | १४ | दिव्या समीर पाटील |
| १५ | चौधरी भारती हनुमान | १६ | निलेश हरिश्चंद्र चौधरी |

**पिठासिन अधिकारी**:- निवडणूक लढविणा-या उमेदवारांपैकी एका सदस्याची महापौर या पदावर निवड करण्यासाठी वर्णानुक्रमे हात वर करुन मतदान घेण्यात आले. (१) श्री.नारायण रतन चौधरी यांना ४८ मते (२) श्री.विलास रघुनाथ पाटील सभागृहात उपस्थित आहेत व त्यांना २५ मते व (३) श्रीम.पाटील स्नेहा मेहुल यांना १६ मते मिळाली आहेत. म्हणजे श्री.नारायण रतन चौधरी यांना सर्वाधिक ४८ मते मिळाली असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम १९(१) व मुंबई प्रांतिक महानगरपालिका (महापौर आणि उपमहापौर या पदांसाठी निवडणूका घेणे) नियम २००५ मधील नियम ७ पोटनियम (७) च्या तरतूदीनुसार श्री.नारायण रतन चौधरी हे भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या महापौर या पदाकरिता निवडून आल्याचे मी घोषित करीत आहे.

**नगरसचिव** :- आजच्या विषयपत्रिकेवरील विषय क्र.२ मी आपणांस वाचून दाखवित आहे.

**विषय क्र.२ : महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम १९(१) मध्ये तरतूदी प्रमाणे पालिका सदस्यांपैकी एका सदस्याची भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या उपमहापौरपदासाठी अडीच वर्षांसाठी निवड करणे.**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका (महापौर आणि उपमहापौर या पदांसाठी निवडणूका घेणे) नियम २००५ चे कलम ४ नुसार दि.१६ फेब्रूवारी २०२६ रोजी उपमहापौर पदासाठी एकूण ०६ उमेदवारांचे ०७ नामनिर्देशन पत्रे प्राप्त झालेली आहेत त्यांची नांवे वाचून दाखवितो.

| अ. क्र. | वेळ | उमेदवाराचे नांव व प्रभाग क्रमांक | सुचकाचे नाव व प्रभाग क्रमांक | अनुमोदकाचे नांवव प्रभाग क्रमांक. |
|---|---|---|---|---|
| १ | ३.३३ | नाईक अस्मिता प्रभुदास<br>१३-क | काटेकर मनोज मोतीराम<br>२१-ड | भगत वनिता सुनील<br>२१-क |
| २ | ३.४१ | मोमीन तारिक अब्दुल बारी<br>९-अ | फारुकी हसनैन इम्तियाज<br>२-क | विजय भगवान भगत<br>११-अ |
| ३ | ३.५४ | नकाते सुहास जालिंदर<br>१८-ड | म्हात्रे सुवर्णा मोहन<br>२०-क | रंजिता मोहन कोंडा<br>१७-क |
| ४ | ४.१० | जावेद गुलाम मोहम्मद दळवी<br>६-ड | रोमा निलेश आळशी<br>६-क | रिषिका प्रदीप राका<br>६-ब |
| ५ | ४.११ | जावेद गुलाम मोहम्मद दळवी<br>६-ड | कशफी शाफ मोमीन<br>८-ब | अंसारी शबाना शमीम<br>८-क |
| ६ | ४.१३ | शेख अरीब मोहम्मद याकूब<br>८-ड | पाटील कमलाकर परशुराम<br>२२-ब | दांडेकर मनिषा सुनिल<br>१३-अ |
| ७ | ४.३० | ॲड.मयुरेश विलास पाटील<br>१-क | अंसारी शबाना शमीम<br>८-क | शेख सलमाबानो मो.अकरम<br>१९-ब |

नियम ६ नुसार सर्व नामनिर्देशन पत्रे मा.पिठासिन अधिकारी यांचेकडे सादर करीत.
(मा.पिठासिन अधिकारी यांनी सर्व नामनिर्देशन पत्रांची छाननी केली.)

**पिठासिन अधिकारी**:- भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या उपमहापौर पदासाठी एकूण ०६ उमेदवारांनी आपले ०७ नामनिर्देशन अर्ज दाखल केलेले आहेत व मी सर्व दृष्टीने नामनिर्देशन पत्रांची छाननी केलेली आहे. सदस्य जावेद गुलाम मोहम्मद दळवी यांनी एकूण ०२नामनिर्देशन पत्रे दाखल केलेली आहेत, इतर सदस्यांनी प्रत्येकी एक नामनिर्देशन पत्र दाखल केले आहेत. सर्व नामनिर्देशन पत्रांची छाननी केल्यानंतर मयुरेश विलास पाटील यांचे सूचक अंसारी शबाना शमीम ह्या जावेद गुलाम मोहम्मद दळवी यांचेसाठी अनुमोदक आहेत. महापालिका अधिनियमातील कलम ४(३) मधील नुसार कोणताही सदस्य एकापेक्षा जास्त उमेदवारांना सूचक किंवा अनुमोदक राहू शकत नाही. अधिनियमातील कलम ६(२) व (३) मध्ये तरतूद आहे की, जर एखादा सदस्य एकापेक्षा जास्त उमेदवारांना प्रस्तावक किंवा अनुमोदक म्हणून स्वाक्षरी करेल तर ज्या उमेदवाराचे नामनिर्देशन पत्र आधी प्राप्त झाले असेल त्यांचे नामनिर्देशन पत्र वैध धरण्यात येईल. तरी महापालिका सचिवांकडे प्राप्त झालेल्या नामनिर्देशन पत्रांची वेळ तपासली असता प्रथम जावेद गुलाम मोहम्मद दळवी यांचे नामनिर्देशन पत्र दाखल झाले असून त्यानंतर ॲड. मयुरेश विलास पाटील यांचे नामनिर्देशन पत्र दाखल झालेले दिसून येत आहे. तरी ॲड. मयुरेश विलास पाटील यांचे नामनिर्देशन पत्र अवैध असल्याचे घोषित करत आहे. तसेच उर्वरीत उमेदवार १) नाईक अस्मिता प्रभुदास २) मोमीन तारिक अब्दुल बारी ३) नकाते सुहास जालिंदर ४) जावेद गुलाम मोहम्मद दळवी ५) शेख अरीब मोहम्मद याकूब या पाच उमेदवारांची नामनिर्देशन पत्रे वैध आहेत. महापौर पदासाठी ज्याप्रमाणे निवडणूक प्रक्रिया राबविली त्याचप्रमाणे उपमहापौर पदासाठी निवडणूक प्रक्रिया पार पडणार आहे. आता वैध उमेदवारांपैकी जर कोणाला आपली उमेदवारी मागे घ्यावयाची असेल तर त्यांना १५ मिनिटांचा अवधी देण्यात येत आहे. आता सभागृहातील घड्याळामध्ये दुपारचे १.१५ वाजलेले आहेत तरी उमेदवारी मागे घेण्याची वेळ सुरु झाली आहे.

(सभागृहाच्या घड्याळात दुपारचे १.२८ वाजले होते.)

**पिठासिन अधिकारी**:- नामनिर्देशन पत्र मागे घेण्यासाठी २ मिनिटांचा अवधी शिल्लक आहे तरी कोणाला नामनिर्देशन पत्र मागे घ्यायचे असेल तर तसा अर्ज देण्यात यावा.

(सभागृहाच्या घड्याळात दुपारचे १.३० वाजले आहेत.)

**पिठासिन अधिकारी**:- आता दुपारचे १.३० वाजलेले आहेत. नामनिर्देशन पत्र मागे घेण्यासाठी १५ मिनिटांची वेळ दिली होती ती संपलेली आहे व सदर कालावधीमध्ये १) नाईक अस्मिता प्रभुदास २) शेख अरीब मोहम्मद याकूब या दोन उमेदवारांनी लेखी सूचना देऊन सादर करुन आपली उमेदवारी मागे घेतली आहे. आता उपमहापौर पदाच्या निवडणूकीसाठी एकंदर ०३ उमेदवार शिल्लक आहेत. त्यांची नांवे मी वाचून दाखवितो.

१) मोमीन तारिक अब्दुल बारी

२) नकाते सुहास जालिंदर

३) जावेद गुलाम मोहम्मद दळवी

हे तीन उमेदवार उपमहापौर पदाच्या निवडणूकीसाठी अंतिमत: निवडणूक लढविणारे उमेदवार राहिलेले आहेत. नियम ७ (३) उपमहापौर पदाच्या निवडणूकीमध्ये हात वर करुन मतदान करण्याची तरतूद आहे. याबाबत काही महत्वाच्या सूचना मी आपल्याला देत आहे त्यांचे काटेकोरपणे पालन व्हावे, अशी अपेक्षा आहे. या संपूर्ण प्रक्रियेचे व्हिडिओ शूटींग केले जात आहे. ज्या उमेदवाराला आपण हात वर करुन मतदान केले आहे त्यांनी आपल्या नावासमोर मतदान केल्याबाबत स्वाक्षरी करावयाची आहे. आपल्या सह्या झाल्यानंतर मतदानअंती कोण निवडून आले आहे, हे मी जाहिर करणार आहे. ज्या पालिका सदस्यांचे मत एकदा नोंदविण्यात आले आहे, अशा सदस्यांस पुन्हा मत देण्याची वा आपले मत बदलण्याची मुभा नियमांत नाही.

मतदान प्रक्रिया आता सुरु होत आहे. अंतिमत: निवडणूक लढविणारे उमेदवार आहेत त्यांच्या आडनावानुसार वर्णानुक्रमे (मराठी वर्णमाला) मतदान होईल.

वर्णानुक्रमे उमेदवारांची नावे
१) जावेद गुलाम मोहम्मद दळवी
२) नकाते सुहास जालिंदर
३) मोमीन तारिक अब्दुल बारी

एकूण तीन उमेदवार आहेत.

श्री. जावेद गुलाम मोहम्मद दळवी यांचे नांव वर्णानुक्रमाने आधी येत आहे. त्यामुळे आधी त्यांच्यासाठी मतदान होईल. उपस्थित सर्व सदस्यांपैकी ज्यांना श्री. जावेद गुलाम मोहम्मद दळवी यांना उपमहापौर पदासाठी मतदान करायचे आहे त्यांनी कृपया आपला हात वर करायचा आहे व मतदान केल्याबद्दल स्वाक्षरी करायची आहे.

उपमहापौर पदाचे उमेदवार श्री. जावेद गुलाम मोहम्मद दळवी यांच्या बाजूने खालील सदस्यांनी मतदान केले.

| अ.क्र. | सदस्यांचे नांव | अ.क्र. | सदस्यांचे नांव |
|---|---|---|---|
| १ | नेहा नविन काठवले | २ | प्रतिभा विलास पाटील |
| ३ | ॲड. मयुरेश विलास पाटील | ४ | विलास रघुनाथ पाटील |
| ५ | रिषिका प्रदीप राका | ६ | रोमा निलेश आळशी |
| ७ | जावेद गुलाम मोहम्मद दळवी | ८ | मोहमद आजीब जमाल अहमद मोमीन |
| ९ | कशफी शाफ मोमीन | १० | अंसारी शबाना शमीम |
| ११ | शेख अरीब मोहम्मद याकूब | १२ | दांडेकर मनिषा सुनिल |
| १३ | म्हात्रे सुचिता रुपेश | १४ | नाईक अस्मिता प्रभुदास |
| १५ | चौधरी बाळाराम मधुकर | १६ | तांबोळी रुकसाना अरिफ |
| १७ | खान सबीया दीन मो. | १८ | चौधरी रोहित बाळाराम |
| १९ | शेख सलमाबानो मो. अकरम | २० | खान अमन ओबैद |
| २१ | भोईर संजय गणपत | २२ | काटेकर वंदना मनोज |
| २३ | भगत वनिता सुनिल | २४ | काटेकर मनोज मोतीराम |
| २५ | पाटील कमलाकर परशुराम | | ------------------------ |

**पिठासिन अधिकारी**:- आता उपमहापौर पदाचे दुसरे उमेदवार श्री.नकाते सुहास जालिंदर यांच्यासाठी मतदान घेतले जाणार आहे तरी ज्या सदस्यांना आपले मत श्री.नकाते सुहास जालिंदर यांना द्यावयाचे आहे त्यांनी आपला एक हात वर करावा आणि मतदान केल्याबद्दल आपल्या नावासमक्ष स्वाक्षरी करावी.

उपमहापौर पदासाठी दुसरे उमेदवार श्री.नकाते सुहास जालिंदर यांच्या बाजूने खालील सदस्यांनी मतदान केले.

| अ.क्र. | सदस्यांचे नांव | अ.क्र. | सदस्यांचे नांव |
|---|---|---|---|
| १ | वैभव एकनाथ भोईर | २ | चौघुले परेश चंद्रकांत |
| ३ | ठाकूर क्षमा मनोज | ४ | पाटील स्नेहा मेहुल |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | शेट्टी राजेश मंजय्या | ६ | गायकवाड नंदिनी महेंद्र |
| ७ | पाटील सुमित पुरुषोत्तम | ८ | रंजिता मोहन कोंडा |
| ९ | शेट्टी संतोष मंजय्या | १० | फुटाणकर अश्विनी सन्नी |
| ११ | मढवी दिपा दिपक | १२ | अबुसाद अशफाक अहमद शेख |
| १३ | नकाते सुहास जालिंदर | १४ | जगताप प्रिती विवेक |
| १५ | टावरे प्रकाश राजाराम | १६ | म्हात्रे सुवर्णा मोहन |
| १७ | टावरे यशवंत जयराम | १८ | गीता विठोबा नाईक |
| १९ | दिव्या समीर पाटील | २० | चौधरी भारती हनुमान |
| २१ | निलेश हरिश्चंद्र चौधरी | | --------------------- |

**पिठासिन अधिकारी**:- आता उपमहापौर पदाचे तिसरे उमेदवार श्री.मोमीन तारिक अब्दुल बारी यांच्यासाठी मतदान घेतले जाणार आहे तरी ज्या सदस्यांना आपले मत श्री.मोमीन तारिक अब्दुल बारी यांना द्यावयाचे आहे त्यांनी आपला एक हात वर करावा आणि मतदान केल्याबद्दल आपल्या नावासमक्ष स्वाक्षरी करावी.

उपमहापौर पदासाठी तिसरे उमेदवार श्री.मोमीन तारिक अब्दुल बारी यांच्या बाजूने खालील सदस्यांनी मतदान केले.

| अ.क्र. | सदस्यांचे नांव | अ.क्र. | सदस्यांचे नांव |
|---|---|---|---|
| १ | ॲड. नगमा फिरदुस हिकमतुल्लाह अन्सारी | २ | खान ईशा इमरान |
| ३ | फारूकी हसनैन इम्तियाज | ४ | खान अब्दुल रेहमान निजामुद्दीन |
| ५ | रुतिका सतिश पाटील | ६ | सिद्दीकी शाहीना सजु |
| ७ | अन्सारी सैफुल्ला | ८ | वाघमारे रोहिदास रंगनाथ |
| ९ | फरजाना इरफान सय्यद | १० | अन्सारी मुसर्रत मोहम्मद अरशद |
| ११ | अन्सारी अलताफ राजा | १२ | शेख महबुब अब्दुल रशीद |
| १३ | डॉ. मोहम्मद तालीश मोहम्मद असिफ मोमीन | १४ | निलमा मलिक अहमद मोमीन |
| १५ | अन्सारी अनम तारिक | १६ | बहाऊद्दीन फराज फजल |
| १७ | मोहम्मद ताहा रियाज अहमद मोमीन | १८ | मोमीन अरशी अनवर |
| १९ | अन्सारी रेश्मा बानो वसीम अहमद | २० | खान फैसल अख्तर हुसैन |
| २१ | मोमीन तारिक अब्दुल बारी | २२ | अंसारी निखत दानिश |
| २३ | अंसारी जोहा असरार | २४ | लाड प्रशांत अशोक |
| २५ | अन्सारी जुबेर अहमद मो. फारूक | २६ | सना बानो रियाज अहमद अन्सारी |
| २७ | अन्सारी शबाना | २८ | खान खान आतिफ नौशाद |
| २९ | विजय भगवान भगत | ३० | शेख सबीहा इसाक |
| ३१ | अन्सारी जाहेदा बानो | ३२ | अन्सारी हुजैफा |
| ३३ | नादीया इरशाद खान | ३४ | सिध्दीकी शाहीददुणिसा इसरार उद्दीन |
| ३५ | खान रजिया नासीर | ३६ | अन्सारी साजिद हुसैन |
| ३७ | मुजावर समरीन बानो इस्माईल | ३८ | मोमीन शबिना बानु मह. युसुफ |
| ३९ | तबस्सुम जाकिर बेग | ४० | खान अब्दुल रहमान खुरा रजा |
| ४१ | अन्सारी समीना मोहम्मद इमरान | ४२ | अन्सारी शकील मुस्तकीम |
| ४३ | नारायण रतन चौधरी | | ------------------------- |

**पिठासिन अधिकारी**:- निवडणूक लढविणा-या उमेदवारांपैकी एका सदस्याची उपमहापौर या पदावर निवड करण्यासाठी हात वर करुन मतदान घेण्यात आले. (१) श्री.जावेद गुलाम मोहम्मद दळवी यांना २५ मते मिळाली आहेत (२) श्री. नकाते सुहास जालिंदर यांना २१ मते मिळाली आहेत व (३) म्हणजे श्री. मोमीन तारिक अब्दुल बारी यांना सर्वाधिक ४३ मते मिळाली असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम १९(१) व मुंबई प्रांतिक महानगरपालिका (महापौर आणि उपमहापौर या पदांसाठी निवडणूका घेणे) नियम २००५ मधील नियम ७ पोटनियम (७) च्या तरतूदीनुसार श्री.मोमीन तारिक अब्दुल बारी हे भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या उपमहापौर या पदाकरिता निवडून आल्याचे मी घोषित करीत आहे.

**पिठासिन अधिकारी**:- उक्त निवडणूकी बाबतचे सर्व अभिलेख नगरसचिव, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका यांचेकडे सोपविण्यात आले. अभिलेखाच्या प्रमाणित प्रतींची मागणी केल्यावर त्या संबंधितांना देण्याबाबत नगरसचिव यांना निर्देश देण्यात आले.

(मा.पिठासिन अधिकारी व मा.आयुक्त यांनी मा.महापौर व मा.उपमहापौर यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले.)

**पिठासिन अधिकारी**:- याबरोबरच सर्व सदस्यांचे आभार मानून आजच्या सभेचे कामकाज संपल्याचे जाहिर करतो.

(राष्ट्रगीत होऊन सभा संपल्याचे नगरसचिव यांनी जाहिर केले.)

**(डॉ.श्रीकृष्णनाथ पांचाळ)**
**पिठासिन अधिकारी महासभा**
**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका तथा**
**जिल्हाधिकारी ठाणे**